भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/१२/२०१६

**१) मोटार सायकल निष्काळजीपने चालवुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २९/१२/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील आरोपी मृतक चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन त्याचा तोल गेल्याने डांबरी रोड वर पडुन डोक्याला मार लागुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने चौकशी अहवाला वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाईले पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन हुंडयाची मागणी करुन लग्नास नकार दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/१०/२०१६ रोजी ते आज पावेतो यातील फिर्यादीची मुलगी हीचे आरोपी क्र. १ याचे सोबत साक्षगंधाचा कार्यक्रम झाला असुन दि. २५/१०/२०१६ ला यातील आरोपी क्र. १ ते ५ यांनी हुंडयाची मागणी केली असता ते पुर्ण न केल्याने लग्न तोडत असल्याचे आरोपीतांनी कळविल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३,४ हुंडा प्रतिबंधक कायदा सह कलम ३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) १ ब्रास रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/१२/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील मा. तहसीलदार ओमप्रकाश काळे यांनी ट्रक्टर क्र. एमएच ३६ एल ४६० क्रमांकाचे ट्रक्टर सह आरोपी चालकास शास्त्री चौक भंडारा येथे थांबवुन आरोपीने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर मध्ये १ ब्रास रेती कि. २,०००/–रु. ची चोरुन नेतांनी मिळुन आल्याने लेखी तक्रार फिर्यादी, रा. मंडल अधिकारी शहापुर तहसिल कार्यालय भंडारा यांनी पोस्टेला लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–**

**अ)** दिनांक २९/१२/०१६ रोजी १६.३० वा. दरम्यान काळी पिवळी गाडी क्र. एमएच ३१/८४४३ च्या आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बस स्टॉप समोर साकोली येथे सार्वजनीक ठिकाणी आमरोड वर उभे करुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण करुन मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोशि. जांभुळकर पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

**ब)** दिनांक २९/१२/०१६ रोजी १७.५० वा. दरम्यान काळी पिवळी गाडी क्र. एमएच ३१ एपी ८३५७ च्या आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन बस स्टॉप समोर साकोली येथे सार्वजनीक ठिकाणी आमरोड वर उभे करुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांना अडथळा निर्माण करुन मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोशि. जांभुळकर पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २९/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.